दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप |
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | मंगळवार | 16 सप्टेंबर 2025 |
| अंक क्र. 128 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

कुठेही काही अनुचित प्रकार, घडल्यास बातमीसाठी आणि व्हिडिओ पाठविण्यासाठी आम्हाला संपर्क करा : आपले नाव गुपित ठेवले जाईल

मो 8421577797

# आरक्षणाच्या मागणीसाठी बीड मध्ये पांढरे वादळ



लाखोच्या संख्येनी बंजारा समाजानी काढला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**बीड | प्रतिनिधी**

बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमाती (ST) प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी सोमवारी (ता १५) बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर बंजारा समाजाचा भव्य मोर्चा काढण्यात आला. एक लाखापेक्षा जास्त समाजबांधव मोर्चात सहभागी झाल्याने बीड शहरातील सर्वच रस्ते मोर्चेकऱ्यांनी भरुन गेले होते. मोर्चेकऱ्यांना माजी मंत्री आ.धनंजय मुंडे व आ विजयसिंह पंडीत यांनी मार्गदर्शन करुन बंजारा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आम्ही कायम सोबत असल्याचे सांगितले.

मराठवाड्यातील बंजारा समाजाला १९४८ पुर्वी असलेले अनुसुचित जमाती (ST) प्रवर्गातुन आरक्षण मिळावे ही मागणी बंजारा समाजाला मागील ७५ वर्षा पासून शासन दरबारी करीत आहे. मराठवाडा निजाम राजवटीत असे पर्यंत बंजारा समाजाला अनुसूचित जमाती चे मिळणारे आरक्षण पुर्ववत सुरू करा ही मागणी असतानाच राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट चा आधार घेऊन मराठा समाजाला आरक्षण दिले आहे. हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाज अनुसुचित जमातीत होता. त्यामुळे हैदराबाद गॅझेटनुसार

## हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार



बंजारा समाजाला अनुसूचित जमाती चे आरक्षण लागू करा या मागणीसाठी सोमवारी दुपारी (ता १५) बीड च्या जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. शहरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चा ची सुरुवात करण्यात आली. मोर्चाचे जिल्हाधिकारी कार्यालया समोर सभेत रुपांतर झाले. यावेळी माजी मंत्री आ धनंजय मुंडे व आ विजयसिंह पंडीत यांनी मोर्चेकऱ्यांना संबोधित केले. बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दिला. बंजारा समाजातील पाच मुलींनी मोर्चेकऱ्यांना मार्गदर्शन केले. सभेचे संचालन व आभार प्रा अरुण पवार यांनी मानले. मोर्चात एक लाखापेक्षा जास्त समाजबांधव सहभागी झाले होते. पारंपरिक वेशातील महिलांची संख्या लक्षणीय होती. मोर्चात आरक्षणाच्या मागणीसाठी दिलेल्या घोषणाबाजी ने बीड शहर दणाणून गेले होते. समाजातील विविध पक्षात काम करणारे नेते कार्यकर्ते मोर्चात व्यासपिठावर बसण्या ऐवजी लोकांमध्ये बसुन होते.

# नैसर्गीक आपत्ती आली... आ.सुरेश धसच " डिझास्टर मॅनेजर "

**आष्टी प्रतिनिधी :**

आष्टी तालुक्यातील कडा पिंपरखेड निमगाव चोभा या भागामध्ये मागील 24 तासांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीमुळे कांबळी / कडी नदीला आलेला महापूर व पाण्याची प्रचंड वाढलेली पाणी पातळी यामुळे घाटा पिंपरी, दादेगाव, डोंगरगण, सुलेमान देवळा, कडा, शेरी खुर्द, या गावांमध्ये दोन नदीपात्रांच्या मध्ये व नदीपात्रालगत लोक वस्त्यांमध्ये लोक अडकलेले आहेत याची माहिती मिळताच नेहमीप्रमाणेच नैसर्गिक आपत्तीला तोंड देत संकटावर मात करण्याची जिद्द आणि जनतेविषयी तळमळ असणारे लोकनेते आमदार सुरेश धस हेच आष्टी तालुक्यातील जनतेसाठी डिझास्टर मॅनेजर ठरलेले आहेत त्यांनी तात्काळ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा प्रशासनाशी संपर्क करून एनडीआरएफ यंत्रणेला ला पाचारण करून हेलिकॉप्टर ची व्यवस्था करून या नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकून पडलेल्या नागरिकांना जीवदान देऊन मोठा दिलासा दिला आहे युवा नेते जयदत्त यांनी पहाटेच तहसीलदार वैशाली पाटील आणि तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांचेशी संपर्क करून डोंगरगण भागामध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन या ढगफुटीची पाहणी केली होती त्याचवेळी आमदार सुरेश धस सकाळी सात वाजल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री अजित दादा पवार बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन अहिल्यानगर जिल्हाधिकारी पंकज आशिया भारतीय लष्कर राष्ट्रीय आपत्ती निवारण दल एनडीआरएफ नाशिक यांच्या संपर्कात राहिल्यामुळे अखेर हेलिकॉप्टर द्वारे कडा, टाकळी अमिया, शेरी बु. येथील नदीच्या पाण्यामध्ये घरामध्ये व शेतामध्ये अडकलेल्या नागरिकांना सुखरूप योग्य स्थळी पोहचवले आहे युवा नेते जयदत्त धस सकाळी सात वाजल्यापासून कडा डोंगरगण दौलवडगाव, धामणगाव जिल्हा परिषद गटात

घाटा, पिंप्री,केळ,हरेवाडी, देऊळगाव घाट,शेडाळा,वेलतुरी, गंगादेवी,सावरगाव मायंबा,डोंगरगण या गावांना भेटी देऊन झालेल्या अतिवृष्टीची व झालेल्या नुकसानीची पाहणी करत आहेत, सागर धस हे देखील कडा व परिसरामध्ये झालेल्या अतिवृष्टी व पाण्यामध्ये अडकलेल्या नागरिकांना मदत करण्यासाठी सहकार्य करत आहेत.

## हेलिकॉप्टर द्वारे केली नागरिकांची सुटका



महाराष्ट्रात ढीगभर लोकप्रतिनिधी आहेत परंतु सतत जनतेच्या संपर्कात राहून वेळोवेळी आलेल्या संकटांमध्ये अत्यंत कर्तव्यदक्षतेने आणि तळमळीने काम करणारे मोजके नेते महाराष्ट्रामध्ये आहेत त्यामध्ये आमदार सुरेश धस यांचा अग्रक्रम आहे त्यामध्ये बीड जिल्ह्यात तर सुरेश धस यांचे शिवाय सोडून कुणीही सापडणार नाही ही वस्तुस्थिती आहे. पावसाची तीव्रता कमी झाल्यानंतर शासकीय पातळीवर योग्य पंचनामे होऊन विहित कालावधीत मदत मिळवण्यासाठी आ. सुरेश धस हे शासन दरबारी नेहमीप्रमाणे पाठपुरावा करणार आहेतच आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरघोस अर्थसहाय्य मिळवून देणारच आहेत याविषयी आष्टी मतदार संघातील जनतेमध्ये विश्वास पसरलेला आहे नेहमीच संकटामध्ये धावून जाऊन जनतेला दिलासा देण्याचे काम कसे करावे ? याचा धडा महाराष्ट्राला घालून देण्याचे काम आमदार सुरेश धस यांनी नेहमीच केले आहे तसेच त्यांनी आज आष्टी तालुक्यामधील जनतेला लोकप्रतिनिधींचे काम काय असते हे करून दाखवून दिले आहे.



## नागरिकांना रेस्क्यू करून रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले

**मौजे टाकळी अमिया येथील :** 1)शिवाजी दगडू महानवर 2) शकुंतला शिवाजी महानवर 3) साईनाथ नवनाथ महानवर 4)पारूबाई दगडू महानवर 5) शुभांगी नवनाथ महानवर. **मौजे कडा येथील :** 1)गोविंद सापते 2) योगेश सापते 3) असराबाई सापते 4) मीनाबाई सापते 5) सुषमा सापते 6) आर्या सापते 7) काजल सापते 8) कृष्णा ससे 9) अमोल बेदरे 10) आकाश बेदरे 11) सुमन बेदरे

**मौजे शेरी खुर्द येथील :** 1) महेश ढोबळे पाटील 2) विजय ढोबळे 3) प्रिती महेश ढोबळे 4) सुर्वणा विजय ढोबळे 5) राजदीप विजय ढोबळे 6) गायबाई रामदास ढोबळे. या सर्व नागरिकांना इंडियन आर्मी नाशिक यांच्या माध्यमातून रेस्क्यू करून रुग्णालयामध्ये तपासणी करता दाखल करण्यात आला आहे.



## अतिवृष्टीमुळे नागरिक अडचणीत; माजी आ.भीमराव धोंडे यांनी पूरग्रस्त भागांना दिल्या तातडीने भेटी वृत्त पान 2 वर



## संपादकीय

# मराठी साहित्याचा विश्वास

९९ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि पानिपतकार विश्वास पाटील यांची निवड यंदा बहुमताने करण्यात आली. साहित्यिकांच्या सरकारी पैशाने मिरवण्याचा उत्सव असे जे स्वरूप या उत्सवाला आले होते त्याला यंदा विश्वास पाटील यांच्यासारख्या समर्थ साहित्यिक आणि कादंबरीकाराच्या निवडीमुळे छेद दिला गेला, असे म्हणावे लागेल. विश्वास पाटील हे नाव साहित्य जगतात आदराने घेतले जाते. ते सनदी अधिकारी तर होतेच पण 'पानिपत', 'महानायक' आणि 'झाडाझडती' सारख्या काही प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखकही आहेत. त्यामुळे साहित्यिक म्हणून




त्यांचा दरारा कायम आहे. यापूर्वी काही अध्यक्ष होऊन गेले. मध्यंतरी साहित्य संमेलने नकोतच असे म्हणणारा गट निर्माण झाला होता. पण संमेलनं चालू आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत त्यांचे प्रत्येक लेखन हे आदरास पात्र असते. भले ते कुणाला आवडो अथवा न आवडो पण साहित्यिक म्हणून त्यांचे मूल्यमापन करता येईल. त्यादृष्टीने विश्वास पाटील यांची निवड ही अत्यंत योग्य आहे. साताऱ्यासारख्या शहरात होणाऱ्या संमेलनात ती यथार्थ आहे. साहित्य संमेलन आणि वाद काही नवे नाही. अगदी पहिल्या संमेलनात म्हणजे १८७८ साली झालेल्या साहित्य संमेलनात वाद गाजला होता, तो म्हणजे तेव्हाचे वंचितांचे पुढारी महात्मा जोतिबा फुले यांना आमंत्रण देऊनही ते स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता आणि त्यामुळे हा वाद गाजला होता. १९७५ च्या साहित्य संमेलनात तर दुर्गा भागवत यांनी मंत्री यशवतराव चव्हाण यांना व्यासपीठावर बसण्यास मनाई केली होती. त्यामुळे यशवंतराव तेव्हा सभागृहात बसले होते. साहित्य समेलनांना वादाची पार्श्वभूमी आहे. यापूर्वी झालेल्या साहित्य संमेलनात सरकारी हस्तक्षेपामुळे संमेलनच नको म्हणून ते गाजले होते. याला अपवाद गेल्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या साहित्य संमेलनाचाही करता येणार नाही. कारण त्या संमेलनात सरकारी हस्तक्षेप सरळ सरळ दिसत होता. सरकारी हस्तक्षेपास कुणाचाच विरोध नाही, पण त्यालाही एक मर्यादा हवी. पण साहित्यिकच आपल्या माना जर राजकारण्याच्या हातात देणार असतील तर मग त्यांना दोष देता येणार नाही. आजवर असेच होत आले आहे. दुर्गा भागवतांसारखे अपवाद सोडले तर बरेचसे साहित्यिक सरकारपुढे नांग्या टाकणारे ठरले आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत तसे म्हणता येणार नाही. सरकारपुढे नांग्या टाकू नका. याचा अर्थ नेहमीच त्यांच्याविरोधात तलवारी उपसून बसा असेही नाही. पण योग्य वेळी आपला स्वाभिमान दाखवला पाहिजे.

विश्वास पाटील यांनी सरकारी नोकरी करताना वेळोवेळी तसा स्वाभिमान दाखवला आहे; परंतु विश्वास पाटील यांच्याबाबतीत असे वाद होण्याची शक्यता दिसत नाही, कारण त्यांचे साहित्यिक स्थान आज प्रचंड उंच आहे आणि त्यामुळे त्यांच्यावर कुणी प्रश्नचिन्ह उपस्थित करणार नाही. शिवाय विश्वास पाटील यांची निवड एकमताने झाली आहे. मुख्य प्रश्न हा आहे, की मराठी साहित्य वाचणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि मराठी वाचन तर हल्ली दुर्मीळच झाले आहे. त्याबाबतीत विश्वास पाटील हे काही तरी करू शकतील. त्यांनीच सांगितले आहे, की नुसते एक गाव वाचनालयाचे म्हणून चालणार नाही तर गावोगावी वाचनालय चळवळ सुरू करावी लागेल. याबाबतीत विश्वास पाटील यांनी वर्षभराच्या मुदतीत काही तरी ठोस करावे हीच अपेक्षा त्यांच्याकडून आहे. आज मराठी साहित्यापुढे अनेक प्रश्न आहेत. मराठी शाळा बंद पडत आहेत आणि मराठी लोक महाराष्ट्रापासून दूर जात आहेत. परभाषिकांनी आक्रमण केले आहे आणि प्रत्येक क्षेत्रात मराठी लोक मागे हटत आहेत किंवा हटवले जात आहेत. याबाबतीत विश्वास पाटील यांनी चळवळ उभारावी हे अपेक्षित आहे. कारण त्यांनी वाचनालय चळवळ उभारण्याचे संकेत दिले आहेत तसेच ते मराठी शाळा वाचवण्यासाठी काही तरी करतील. प्रत्येक मराठी साहित्य संमेलनाने या अगोदर शब्द दिला होता. पण पुढे काहीही झाले नाही. मराठी वाचकांची संख्या फारच कमी आहे आणि आपल्याकडे ना. सी. फडके, आचार्य अत्रे वगैरे वाचणाऱ्यांची पिढी एकेकाळी होती, ती आता अस्तंगत झाली आहे. नव्या पिढीला हॅरी पॉटर वाचण्याचे वेड आहे आणि तेही जाऊन आता मोबाइल आणि इतर गॅझेटचे वेड आहे. त्यापासून नव्या पिढीला वाचवायचे कसे असा यक्षप्रश्न आहे. तो विश्वास पाटील आणि त्यांच्यासारख्या साहित्यिकांवर ही फार मोठी जबाबदारी आहे. कारण त्यांच्यावरच हे शिवधनुष्य पेलण्याची ताकद आहे आणि त्यांच्याकडे तितकी प्रतिभाही आहे.

विश्वास पाटील हे शेतकरी कुटुंबातून आलेले. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नेर्ले येथे झाला. त्यांचे वडील चौथी पास होते, तर आईने शाळाही पाहिली नाही. त्यांचा विश्वास हा पुत्र आज सनदी अधिकारी म्हणून निवृत्त झाला. त्यांनी प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्या लिहिल्यात. 'पानिपत' आणि 'महानायक' ही सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावरील कादंबरी प्रचंड गाजली. शेतकरी कुटुंबातून आलेल्या विश्वास यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची दुःखे आणि वेदना यांचा जवळून परिचय होता, पुढे ते शासकीय सेवेत रुजू झाले तेव्हा त्यांच्या ते कामी आले. शासकीय सेवेत असताना त्यांनी शासकीय योजनांचा लाभ लोकांना कसा देता येईल हे पाहिले. पण त्यांच्या साहित्यिक योगदानाविषयी बोलताना असे म्हणता येईल, की त्यांची साहित्यिक वीण ही त्यांना कादंबरी लेखनाकडे घेऊन गेली. 'महानायक' असो की 'झाडाझडती' या सर्व कादंबऱ्यांतून उपेक्षित वर्गाची तडफड दिसते. पानिपतचा अपवाद वगळता त्यांची ही उपेक्षितांची तडफड नेहमीच केंद्रस्थानी राहिली आहे. साहित्य संमेलन म्हणजे केवळ तीन दिवस मिरवण्याचा उत्सव ही प्रथा विश्वास पाटील बदलून टाकतील यात काही शंका नाही. साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने जनसामान्यांची चळवळ कशी होईल हे पाटील पाहतील यात शंका नाही. विश्वास पाटील यांच्या निवडीने एक सर्वोत्कृष्ट कादंबरीकार आणि साहित्यिकाची निवड झाली आहे. त्यांच्याकडून मराठी रसिकांना अपेक्षाही तितक्याच आहेत.

## मुलखावेगळी माणसं : नारळाच्या करवंटीचा सदुपयोग

आपल्याकडे दरवर्षी २ सप्टेंबर हा दिवस नारळ दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील घराघरात नारळ हा जेवणातील अविभाज्य घटक असतो. मोठ्या प्रमाणात नारळाच्या करवंट्या कचऱ्यात टाकल्या किंवा जाळलया जातात. मालवणमधील पर्यावरणप्रेमी तरुण प्राध्यापक हसन खान यांनी यावर उपाय शोधला आहे. करवंट्यापासून आकाशकंदील,दिवे,बाउल,चमचे आदी तयार कर्णयचे प्रशिक्षण त्यांनी हुनर कि पाठशाळा या उप्रक्रमातून विद्यार्थ्यांना दिले आहे.

नारळाचे झाड म्हणजे कल्पवृक्षच. याच्या फळाप्रमानेच झावळ्या आणि खोडही फार उपयुक्त असतात. झावळ्या सुकवूंन तात्यांचे हिर काढून ते बांधून झाडण्यासाठी लागणारे खराटे बनवले जातात. हिरव्या झावळ्यांपासून देखील वेगवेगळ्या कळतमक वस्तू घडवता येतात. नारळाच्या कात्यापासून दोरखंड करतात. नारळातील खोबरे काढल्यानंतर उरलेल्या करवंट्या कचऱ्याच्या ढिगात टाकणे किंवा जाळणे यामुळे प्रदूषणात भरच पडते.



त्याऐवजी या नैसर्गिक संसाधनांचा कल्पकतेने वापर करून पर्यावरण पूरक वस्तू बनविण्याचा विचार खान याना सुचला. साडेतीन वर्षांपूर्वी त्यांच्या डोक्यात हि कल्पना आली. त्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने त्यांनी वर्षभराचा प्रशिक्षण कार्यक्रम घेतला. त्यात याच नारळाच्या करवंट्यापासून तयार केलेल्या शोभेच्या सुंदर वस्तू ते समाजमाध्यमांवर प्रसारित करू लागले. नारळासारख्या कल्पतरूंचे लोकांना टाकाऊ वाटणारे भाग फेर वापरासाठी आकर्षक पणे सज्ज करणे हा पर्यावरण पुरक पर्यायच आहे. याच कौशल्य प्रशिक्षणातून नवनीत मेस्त्री,पायल शिरपुते,मधुरा ओरस्कार,शीतल अटक,श्रेया अटक,यासारखे तरुण कलाकार तयार झाले. या तरुणांना यातून रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. खान यांच्या मार्गदर्शनाखाली नव्या दमाच्या तरुणांनानि दिवाळीत नारळाच्या करवंट्या पासून षट्कोनी आणि दंडगोल आकाराचे बनवलेले सुंदर आकाशकंदील हे लोकांचे आकर्षण ठरले होते. याच करवंट्यापासून लहान मोठे दिवे,पणत्या,आणि इतर शोभेच्या वस्तू देखील प्रचंड लोकप्रिय ठरल्या . राखी पौर्णिमेला याच कलाकारांनी तर चक्क नारळाच्या करवंटी पासून सुंदर राख्या देखील बनवून कमालच केली. कॉफीसाठी मग ,चमचे,बाउल अशा दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या अनेक वस्तू घडविल्या. हि उत्पादन विकल्प या नावाने बाजारपेठेत विक्रीस आणली गेली विकल्प म्हणजेच पर्याय. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आयुष्यात उपयोगी पडणारी कौशल्य खान सर हुनर कि पाठशाळा मध्ये शिकवतात आणि त्याच्यातील एका कलाकाराला घडवतात. एकूच,खान सरा सारखी टाकाऊतून टिकाऊ वस्तूंची निर्मिती करणारी मंडळी हि खऱ्या अर्थाने मुलखावेगली मानस असतात.

## माझं मत : जीएसटी ची बदलेली कररचना स्वागतार्ह आहे का?

**शशांक गुलगुले, आर्थिक विश्लेषक**

अलीकडेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जीएसटीची नवीन कर रचना २२ सप्टेंबर पासून नव्या स्वरूपात लागू होणार असल्याची घोषणा केली जी सर्वसामान्यांच्या आणि व्यापाऱ्यांच्या दृष्टिकोनातून देखील स्वागतार्ह बाबच आहे. नव्या कर रचनेनुसार फक्त ५ आणि १२ टक्के अशा दोन टप्प्यात जीएसटी असेल ज्यामुळे खाद्यपदार्थ,औषध,इलेक्ट्रॉनिक वस्तू,घरगुती वापराच्या वस्तूंच्या किमती या कमी होणार आहेत. शिवाय दारू,सिगारेट,तंबाखू अशा चैनीच्या वस्तूवर ४० टक्के लावलेला कर हि देखील समाज व्यसनमुक्त करण्यासाठीचाच एक प्रयत्न म्हणून त्याकडे व्यसनाधीन लोकांनी सकारात्मक दृष्टीने बघावं असं वाटत.

**कल्पना रेळे, सरकारी अधिकारी**

२२ सप्टेंबर पासून जीएसटी च्या रचनेमध्ये जो बदल होणार आहे त्यामुळे मध्यमवर्गीय आणि गरीब नोकरदार वर्ग हा सुखावला आहे. कारण अगदी हॉटेलिंग पासून अगदी घरगुती वापराच्या वस्तूंवर याअगोदर भरमसाठ कर लादला गेला होता जो अनावश्यक आणि ग्राहकांना लुटणारच होता. खरं तर या अगोदर एक देश एक कर अशी कराची साधी आणि सोपी रचना होती. शिवाय नियोजन आयोगाद्वारे सर्व घटकांचा विचार करून कर रचना होती मात्र नीती आयोग आणून आणि जीएसटीची अव्वाच्या सव्वा रचना हि चुकीची होती मात्र आता देर आ ये दुरुस्त आये असं म्हणावं लागेल.

## चलती का नाम गाडी : जीप इंडियाद्वारा जीएसटी सुधारणांचे स्वागत; आणि किंमत कपातीची घोषणा

जीप इंडियाने नुकतीच घोषणा केली की ते नुकत्याच जाहीर केलेल्या जीएसटी सुधारणांचा संपूर्ण फायदा त्यांच्या ग्राहकांना देईल, ज्यामुळे २२ सप्टेंबर २०२५ पासून जीप श्रेणी लक्षणीयरीत्या अधिक परवडणारी होईल.

जीएसटी स्लॅबच्या तर्कसंगतीकरणासह, पोर्टफोलिओमधील कंपास, मेरिडियन, रँग्लर आणि ग्रँड चेरोकी एक्स-शोरूम किमतींमध्ये मॉडेल आणि प्रकारानुसार ₹.२६ लाख ते जवळजवळ ₹.८ लाखांपर्यंत लक्षणीय कपात होईल.

ही घोषणा करताना, स्टेलांटिस इंडियाचे ऑटोमोटिव्ह ब्रँड्सचे व्यवसाय प्रमुख आणि संचालक कुमार प्रियेश म्हणाले: "जीपमध्ये, आम्ही नेहमीच आमच्या महान क्षमतांसह अपवादात्मक मूल्य देण्यावर विश्वास ठेवला आहे. जीएसटी सुधारणा ही एक परिवर्तनकारी पाऊल आहे जी ग्राहकांना स्पष्टता आणि परवडणारी क्षमता आणते. आमच्या खरेदीदारांना पूर्ण लाभ देताना आम्हाला आनंद होत आहे, ज्यामुळे जीप जीवनशैली पूर्वीपेक्षा अधिक सुलभ बनते. हे पाऊल जीपची मालकी असणे ही केवळ एक आकांक्षा नाही तर अनेक भारतीयांसाठी एक वास्तव आहे याची खात्री करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देते." - **संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**



## अतिवृष्टीने जिल्ह्याला झोडपले; नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

### खा.बरजंग सोनवणे यांचे पालकमंत्री अजित पवार यांना पत्र

**बीड** : सलग दोन दिवस बीड जिल्ह्यावाशीयांना अतिवृष्टीने झोडपले आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व नद्या दुथडी भरून वाहत आहेत. परिणामी, शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक भागात पिके पाण्यात असून काही ठिकाणी नदीपात्राशेजारील जमीनी देखील खरडून गेल्या आहेत. शिवाय घरांची देखील पडझड झालेली असून नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

पालकंत्री पवार यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, बीड जिल्ह्यात सलग पावसामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सकाळी सात वाजल्यापासून



स्वत: परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कडा गावातील ११, चोभा निमगावातील १४, घाटा पिंपरीतील ७, पिंपरखेडातील ६, धानोऱ्यातील ३ व डोंगरगणमधील ३ नागरिक असे मिळून ४४ लोक अडकलेले होते. याच बरोबर जिल्ह्यातील बीड तालुक्यातील नाळवंडी, नेकनूर, येळंबघाट, आष्टी तालुक्यातील दौलावडगाव, धानोरा, कडा, पिंपळा, टाकळसिंग, दादेगाव, अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी, पाटोदा, केजमधील केज, यूसूफ, होळ, शिरूर तालुक्यातील शिरूर महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद आहे. आष्टी तालुक्यात तर कडा आणि परिसरात ढगफुटीसदृस्य पाऊस झालेला आहे. कधी नव्हे ते नदीला मोठा पुर आला. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होत. तर अनेक भागात मुसळधार पावसामुळे विविध नद्यांच्या पाण्याने पात्र ओलांडल्याने शेतात पाणी शिरल आहे. शिवाय जमीन खरडून गेल्या आहेत. यामुळे पिकांचे आणि शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. याच बरोबर काही भागात घरांची पडझड देखील झाली आहे. आष्टी तालुक्यात पुराचे पाणी घरात घुसून संसारोपयोगी साहित्याचेही नुकसान झाले आहे. यामुळे शासनाने तातडीने स्पॉटवर जावून पंचनामे करावेत, व सरसकट नुकसान भरपाई द्यावी, असे पत्रात म्हटले आहे.

## सेवा पंधरवाडा राबविण्यासाठी महसूल विभाग सज्ज

**आष्टी | प्रतिनिधी**

तालुक्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये सेवा पंधरवाडा साजरा करण्यात येणार आहे.सेवा पंधरवाडा कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येत असून,या पंधरवड्यात विभाग निहाय अधिकारी-कर्मचारी सज्ज असून शेतकऱ्यांनी आपली कामे करून घ्यावीत असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत सेवा पंधरवडा राबविण्या संदर्भात तहसीलदार वैशाली पाटील यांनी सोमवार दि.१५ रोजी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे माहिती दिली आहे.पत्रकात पुढे म्हटले आहे की,छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान



नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये सेचा पंधरवाडा म्हणून साजरा करण्यात येणार असून,हा पंधरवडा ३ टप्यात राबविण्यात येणार आहे.यात पांदण रस्ते विशेष माहीम कालावधी १७ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर, सर्वांसाठी घरे कालावधी २२ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर,नाविन्यपूर्ण उपक्रम राविणे कालावधी २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत वरील उपक्रम राबविण्यात येणार असून,या पंधरवड्यात वरील दर्शविलेली विविध कामे करून घेण्यासाठी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा,असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

## अतिवृष्टीमुळे नागरिक अडचणीत; माजी आ.भीमराव धोंडे यांनी पूरग्रस्त भागांना दिल्या तातडीने भेटी

**आष्टी | (प्रतिनिधी)**

गेल्या २४ तासांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे आष्टी, पाटोदा,शिरूर का. तालुक्यातील अनेक भागात पाण्याचा मोठा प्रकोप झाला आहे.ढगफुटीच्या स्वरूपात झालेल्या पावसामुळे नाले- ओढ्यांना पूर आला आहे.अनेक ठिकाणी नागरिक अडकून पडले आहेत.या परिस्थितीची दखल घेत माजी आ. भीमराव धोंडे यांनी आष्टी तालुक्यातील पूरग्रस्त भागांना भेट देऊन पाहणी केली. त्यांनी प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेत नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

**- २४ तासांपासून आष्टी तालुक्यातील विविध ठिकाणी ढगफुटीसह अतिवृष्टी झाल्याने पाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.**

**या अतिवृष्टीमुळे धामणगाव येथील अफरोज बशीर शेख बागवान (वय ३५ वर्षे) हा तरुण सकाळी धामणगावाच्या पुरामध्ये वाहून गेला.या**

**घटनेची माहिती मिळताच माजी आ.भीमराव धोंडे यांनी तत्काळ धामणगाव येथे जाऊन निवासस्थानी भेट दिली.त्यांच्या कुटुंबीयांना आधार दिला.**

यावेळी माजी आ.धोंडे यांनी जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख व तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क हेलीकाप्टर तातडीने पाठविण्याची मागणी केली आहे. साधत तातडीने मदत कार्य सुरू करण्याच्या सूचना दिल्या.नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन आवश्यक ती सर्व उपाययोजना त्वरित राबवाव्यात अशा स्पष्ट सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून मदत कार्याला वेग देण्यात येत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाशी सहकार्य करावे असे आवाहन माजी आ.भीमराव धोंडे यांनी केले.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# जालना व बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीची पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतली दखल

## नुकसानीची पाहणी करून अहवाल तयार करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

## काळजी करु नका, आपत्तीसदृश परिस्थितीत शासन आपल्या पाठिशी

**मुंबई**

जालना आणि बीड जिल्ह्यांत मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पुरासारखी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे तसेच जनावरांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करून अहवाल तयार करण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा ना. पंकजाताई मुंडे यांनी कलेक्टर यांना दिले आहेत. काळजी करु नका, आपत्तीसदृश परिस्थितीत शासन पाठिशी असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

दरम्यान, बीड मधील विशेषत: आष्टी व गेवराई तालुक्यातील नुकसानीची देखील त्यांनी माहिती घेऊन प्रशासनाला सूचना केल्या आहेत. ना.पंकजाताई मुंडे दोन्ही जिल्ह्यांच्या प्रशासनाशी सातत्यानं संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेत आहेत तसेच मदतकार्य तात्काळराबविण्याचे निर्देशही दिले आहेत. या आपत्तीसदृश परिस्थितीत शेतकरी बांधव आणि नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. ज्या भागांत रस्ते बंद आहेत, तेथून प्रवास करू नये. पूरग्रस्त भागांपासून लांब राहावे आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. नागरिकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासन सज्ज असून, बेघर झालेल्यांना तात्पुरता निवारा देण्यात येत आहे. तसेच नुकसान झालेल्या ठिकाणी पंचनामे करून शासकीय मदत पुरविण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

### काळजी करु नका, शासन पाठीशी

**■ या नैसर्गिक संकटाचा धीराने सामना करावा. शेतकरी बांधवांनी काळजी करू नये. शासन तुमच्या पाठीशी ठाम उभं आहे असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.**

### बीड जिल्ह्यातील नुकसानीबाबत प्रशासनाला निर्देश

**■ बीड जिल्ह्यातील आष्टी आणि शिरूर तालुक्यांतील गंभीर पूरस्थिती लक्षात घेता तिथल्या प्रशासनाशीही संपर्क सुरू असून आवश्यक ती सर्व मदत पोहोचविण्याचे आदेश ना. पंकजाताईंनी प्रशासनाला दिले. आष्टीतील धामणगांव व कडा परिसरात अतिवृष्टीने मोठे नुकसान झाले आहे. पुरातन अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टरच्या मदतीने बाहेर काढावे लागले.**

# महाडिक युवाशक्तीच्या गणेशमूर्ती सजावट स्पर्धा

## माजी नगरसेवक केदार नलवडे यांच्याहस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण



**शिराळा / प्रतिनिधी**

वनश्री युथ फाऊंडेशन संचलित महाडिक युवाशक्ती शिराळा शहर आयोजित भाजपा जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या मार्गदशनाखाली घरगुती गणेश मूर्ती सजावट स्पर्धा उत्साहात पार पडल्या या स्पर्धेचे बक्षीस वितरण मा.नगरसेवक व संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष केदार भैय्या नलावडे यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेसाठी अनेक घरगुती गणेश मूर्ती सजावट भक्तांनी सहभाग घेतला होता या स्पर्धेला गणेश भक्तांच्या कडून चांगला प्रतिसाद मिळाला अध्यात्मिक चळवळ टिकावी व त्याला चालना मिळावी हा या स्पर्धेचा उद्देश होता

घरगुती गणेशमुर्ती सजावट स्पर्धेचे मानकरी

प्रथम क्रमांक- अनिरुद्ध नलावडे (MIDCरोड) १३००३/-व चांदीचा गणपती , सन्मान चिन्ह; द्वितीय क्रमांक- कोमल भरत पाटील (डांगे गल्ली) १०००३/-व सन्मान चिन्ह, तृतीय क्रमांक-धैर्यशील विजय पाटील ( देशमुख गल्ली) ७००३/-व सन्मान चिन्ह , चतुर्थ क्रमांक - मनोज विलास काटकर ( प्राध्यापक कॉलनी) ५००३/-व सन्मान चिन्ह, पाचवा क्रमांक- विनायक नलवडे (भोई गल्ली)३००३/-व सन्मान चिन्ह, उत्तेजनार्थ- शामराव हणमंत कदम (कदमवाडी)१००३/-व सन्मान चिन्ह, शुभम कनूंजे (नाझरे गल्ली)१००३/-व सन्मान चिन्ह, रोहित संतोष यादव (पाडळी रोड)१००३/-व सन्मान चिन्ह, पूजा प्रशांत कबाडे (निकम गल्ली)१००३/-व सन्मान चिन्ह, संतोष हिरवडेकर (होळीचा टेक) १००३/-व सन्मान चिन्ह, नितीन कुरणे (प्राध्यापक कॅालनी)१००३/- व सन्मान चिन्ह या स्पर्धेचे संयोजन नगरसेवक केदार नलावडे व मित्र परिवारातर्फे करण्यात आले होते.

या कार्यक्रम प्रसंगी सुदाम गायकवाडसर ,विजय पाटील रामभाऊ जाधव ,प्रा.आशिष पारेख,प्रा.चेतन शहा,प्रा.विकास पाटील,प्रा.अमोल पाटील ,हारुण शेख, राहुल खबाले, सौरभ नलावडे, वैभव इंगवले ,चेतन शिंत्रे ,अजित कुंभार ,अमित माने,राज पाटील,अभिषेक हासबणीस,सचिन दिवटे,झाकीर दिवान,ऋषीकेश गोसावी,ऋषी खुर्द व महाडीक युवा शक्तीचे कार्यकर्ते उपस्थित होते.


# कवितेच्या घराचे बापुरावजी पेटकर काव्य पुरस्कार झाले जाहीर

## "भुकेचा केंद्रबिंदू गझलसंग्रहाची राज्यस्तरीय उत्कृष्ट गझलसंग्रह पुरस्कारासाठी निवड"

**महागाव प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या काव्यक्षेत्रात नवनव्या उपक्रमांसाठी चर्चेचा विषय असलेल्या कवितेच्या घराच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२५ च्या बापुरावजी पेटकर राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्य पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. चंद्रपूर येथील मानवटकर कॉलेज ऑफ नर्सिंग ॲन्ड फार्मसी येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार जाहीर करण्यात आले.

यावेळी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, श्रीमती रुखसाना सिंग, प्रसिद्ध समीक्षक प्रा. श्रीकांत पाटील, प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. वासुदेव गोडगाणे, सुप्रसिद्ध सर्जन डॉ. माधुरी मानवटकर, सुप्रसिद्ध भूलतज्ज्ञ डॉ. प्रकाश मानवटकर, कवितेच्या घराचे कार्यवाह डॉ. प्रमोद नारायणे, संस्थापक श्रीकांत पेटकर मंचावर उपस्थित होते. बापुरावजी पेटकर उत्कृष्ट गझलसंग्रह पुरस्कार गजानन वाघमारे, महागाव जि. यवतमाळ यांच्या 'भुकेचा केंद्रबिंदू' या गझलसंग्रहाला जाहीर झाला आहे. बापुरावजी पेटकर उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार प्रभू राजगडकर (नागपूर ) यांच्या 'येथे आमचाही श्वास कोंडतो आहे' या कविता




संग्रहाला मिळाला. उत्कृष्ट बालकवितासंग्रह पुरस्कार प्रसेनजित गायकवाड (नागपूर) यांच्या 'तसे मी काय करू' या बालकवितासंग्रहाला जाहीर झाला असून, बापुरावजी पेटकर राज्यस्तरीय विशेष काव्य पुरस्कारासाठी किरण भावसार (नाशिक) यांच्या 'घामाचे संदर्भ' हा कवितासंग्रह, नंदकिशोर दामोधरे (अमरावती) यांचा 'किनारे सरकत आहेत' हा गझलसंग्रह तसेच मोहन काळे (नवीमुंबई) यांचा 'एकदा आपणच व्हावे मोर' हा बालकवितासंग्रह निवडण्यात आला आहे. राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्य पुरस्कारासाठी प्रत्येकी ५ हजार रूपये रोख, मानपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. तर विशेष पुरस्कारासाठी सन्मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

या पुरस्कारांसाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील कवींकडून व प्रकाशकांकडून १५८ काव्यसंग्रह प्राप्त झाले होते. पुरस्कार निवड समितीचे परीक्षक म्हणून अकोला येथील प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. अशोक इंगळे, वर्धा येथील प्रसिद्ध गझलकार संजय इंगळे तिगावकर तसेच मुंबई येथील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते कवी एकनाथ आव्हाड यांनी उत्कृष्ट ग्रंथांची पुरस्कारांसाठी निवड केली.

शनिवार दि. ४ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता कवितेचे घर, शेगांव (बु.), ता. वरोरा, जि. चंद्रपूर येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल असे कवितेच्या घराचे श्रीकांत पेटकर, कार्यवाह प्रा. डॉ. प्रमोद नारायणे, संकल्पनाकार किशोर पेटकर, कार्यक्रम प्रमुख डॉ. संदीप भेले, संयोजक विकास जवादे व सूर्यकांत पाटील यांच्या वतीने कळविण्यात आले आहे. पुरस्कारप्राप्त कवींचे महाराष्ट्रातील मान्यवर साहित्यिकांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# महाराष्ट्रात पावसाने घातला धुमाकूळ



**मुंबई**

राज्यात पावसाचे थैमान चालू असून मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्र आणि कोकणात काही ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे. मुंबई, नवी मुंबई व पनवेल भागातही मुसळधार पावसाने मोठं नुकसान झालं आहे. पनवेलमधील जनजीव विस्कळीत झालं आहे. पावसाने मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस राज्यात सर्वदूर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, रविवारपासून कोसळणाऱ्या या पावसामुळे चार जणांचा बळी गेला असून, मराठवाड्याला सर्वाधिक फटका बसला आहे.

# संतोष झोळ यांचा वाढदिवस श्री समर्थ संत गाडगे बाबा वृद्ध धाम आश्रमात अन्नदान करुन साजरा

**मुंबई, (केतन भोज)**

आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सॲप ग्रुपच्या अंतर्गत २८ वा सामाजिक उपक्रम १० सप्टेंबर २०२५ रोजी ग्रुपचे सदस्य संतोष झोळ यांनी त्यांच्या ४४ व्या वाढदिवसा निमित्त आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या ग्रुपच्या अंतर्गत जिल्हा रायगड,तालुका अलिबाग,मुक्काम परहुर या गावातील श्री समर्थ संत गाडगे बाबा वृध्द धाम या आश्रमात एक वेळचे अन्नदान अर्पण करून आपला वाढदिवस साजरा केला.

सामाजिक कार्याची आवड असलेले संतोष झोळ हे दरवर्षी आपल्या वाढदिवसा निमित्त काही ना काही अनाथ आश्रमास मदत करत असतात,या वर्षी हा सामाजिक कार्यक्रम झोळ यांनी आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या ग्रुप अंतर्गत ग्रुपचे सदस्य,संस्थापक,संचालक संतोष पाटील-विरार,सेक्रेटरी लवेश म्हात्रे- उरण,उपसेक्रेटरी भालचंद्र उकिर्डे-कुर्ला,कार्यालय प्रमुख रंजीत नरवणकर-चेंबूर,सल्लागार लिलाधर भोईर-पनवेल,मंगेश कवळे-अलिबाग तसेच संतोष झोळ यांचे संपूर्ण कुटुंब यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.




# महात्मा फुले जनआरोग्य योजनेची व्याप्ती वाढवली; हृदय, फुफ्फुस, किडनी प्रत्यारोपणासाठी स्वतंत्र निधी उभारणार

**मुंबई**

एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेमध्ये मिळणाऱ्या उपचारांची संख्या २३९९ पर्यंत वाढविण्याचा तसेच हृदय, फुफ्फुस, किडनी प्रत्यारोपणासारख्या पाच लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी स्वतंत्र निधी उभारण्याचा निर्णय सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य या दोन्ही योजनांच्या एकत्रित अंमलबजावणीच्या धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्याकरीता गठित राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या नियामक परिषदेची बैठक फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ हे उपस्थित होते. तर आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे दूरचित्र संवादाच्या माध्यमातून उपस्थित होते.




आरोग्य विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी सादरीकरणाद्वारे जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत केलेल्या प्रमुख उद्दिष्टपूर्तीचे तसेच योजनेतील उपचारांच्या यादीत सुधारणेसाठी नेमलेल्या अभ्यास समितीचा अहवाल मांडला. त्याला मान्यता देताना महात्मा फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य या दोन्ही योजनेत सुचीबद्ध असलेल्या रुग्णालयांचे तालुकानिहाय मॅपिंग करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले.

एखाद्या तालुक्यात ३० खाटांचे एकही रुग्णालय नसल्यास अशा ठिकाणी उपलब्ध असलेल्या रुग्णालयात योजनेचा लाभ देऊन त्यांची देयके देण्याची वेगळी व्यवस्था निर्माण करावी. तसेच अशा तालुक्यामध्ये ३० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यासाठी खाजगी रुग्णालयांना आमंत्रित करून सुविधा द्याव्यात. तसेच या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामीण भागात आरोग्य मित्रांची संख्या वाढविण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले.

जन आरोग्य योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयाना त्यांची देयके वेळेत देण्यात यावीत. जेणेकरून ती रुग्णालये रुग्णांना दर्जेदार उपचार देतील. तसेच या योजनेतील उपचार, रुग्णालये, लाभ यांची माहिती मिळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ॲप तयार करावे. त्यामध्ये चॅटबॉटद्वारे सर्व माहिती मिळण्याची व्यवस्था करावी अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या. आरोग्य विभागाने गेल्या सहा महिन्यात अत्यंत गतीने कामात सुधारणा करून उत्तम काम केले आहे. योजनेच्या अंमलाबजावणीसाठी अधिक गतीने व पारदर्शकपणे काम करावे, जेणेकरून पुढील काळात देशातील पहिल्या तीनमध्ये राज्याचा क्रमांक येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

ग्रामीण भागातील रुग्णालयांसाठी खाटांची मर्यादा कमी करून २० पेक्षा कमी खाटा असलेल्या ग्रामीण भागातील रुग्णालयांचा समावेश या योजनेत करावा. या योजनेसाठी राबविण्यात येणाऱ्या पीएमएस प्रणालीमध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय निधीशी जोडण्यात यावी.

आदिवासी बहुल भागात उपचारांच्या निकषामध्ये शिथिलता देण्यात यावी. तसेच आधुनिक उपचारांचा समावेश योजनेत करावा, अशा सूचना मंत्री शिरसाट, तटकरे यांनी केल्या.

### योजनेत महत्वाचे बदल

**■ महात्मा फुले जनआरोग्य व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेतील उपचारांमध्ये १३५६ वरुन २३९९ अशी वाढ. प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर करता येऊ शकतील अशा २५ उपचारांचा योजनेत समावेश. सर्व ग्रामीण आणि शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचा योजनेत समावेश. उपचारांच्या दर निश्चितीला मान्यता. रुग्णालयांना श्रेणीनुसार दर देण्याची पद्धत बंद करून राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या धोरणानुसार गुणवत्ता प्रमाणपत्र धारक रुग्णालयांना आणि आकांक्षित जिल्ह्यातील रुग्णालयांना प्रोत्साहनपर अधिकची रक्कम देण्यात येणार.**

दैनिक अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार, दि. 16 सप्टेंबर 2025




# बीड जिल्ह्यात पावसाचा कहर

## धनंजय मुंडे यांनी केले नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात पावसाने हाहाकार माजवला असून परळी–अंबाजोगाईसह जिल्हाभरात २४ तासांपासून मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. अनेक प्रकल्पांचे दरवाजे उघडल्याने नद्या दुथडी भरून वाहत आहेत. पुलांवरून पाणी वाहत असून, अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. काही ठिकाणी रस्ते बंद करण्यात आले असून वाहतूक विस्कळीत झाली आहे.

या पार्श्वभूमीवर माजी मंत्री व आ. धनंजय मुंडे यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन कक्ष किंवा थेट माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. सततच्या पावसाने जिल्ह्यातील अनेक गावांतील जनजीवन विस्कळीत झाले असून, प्रशासन आणि मदत यंत्रणा सतत कार्यरत आहेत. नागरिकांना विनाकारण बाहेर पडू नये, सावध राहावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.



### नागरिकांनो सतर्क राहा

मी सातत्याने प्रशासनाशी संपर्कात असून जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर आहे. नागरिकांनी सुरक्षित राहावे, वाहत्या पाण्यात पाय टाकू नयेत, पुलावरून पाणी असताना वाहन चालवू नये. पडझड झालेल्या घराजवळ न थांबता सुरक्षित स्थळी हलावे

- माजी मंत्री व आ. धनंजय मुंडे

## मांजरा धरणातून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग

छत्रपती संभाजीनगर

बीडमधील केज, धाराशिवमधील कळंब आदी परिसरात रविवारी झालेल्या पावसानंतर मांजरा धरणातून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. धरणाचे गेट क्र. १, ३, ४, ६ या चार वक्री दरवाजे ०.२५ मीटरने उघडून नदीपात्रात ३ हजार ४९४ क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरणामध्ये येणाऱ्या पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवला किंवा कमी केला जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नदीपात्रात केला जात असलेल्या पाण्याचा विसर्ग पाहता प्रशासनाकडून काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

मागील दोन दिवसांपासून जिल्ह्यातील विविध ठिकाणी मुसळधार पाऊस बरसत आहे. जवळपास सर्वच तालुक्यात मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. आधीच धरणे भरलेली असताना पुन्हा झालेल्या मुसळधार पावसाने तेर परिसरातील तेरणा धरणाने शनिवारी रात्री रौद्र रूप धारण केले होते. तेर, रामवाडी, कोंबडवाडी, गोवर्धनवाडी येथील शेतशिवार खरडवून मोठ्या प्रमाणात माती आणि पिके वाहून गेली आहेत. गावातही पाणी शिरल्याने ग्रामस्थांच्या अन्नधान्याचे मोठे नुकसान झाले आहे.



धाराशिव तालुक्यातील तेर, गोवर्धनवाडी, रामवाडी, उपळे दुमाला, कसबे तडवळे, येडशी, येरमाळा, कोंबडवाडी या गावांसह परिसरात शनिवारी सायंकाळी २०० मिलीमीटर पाऊस पडल्याने सोयाबीन पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. पावसाचे पाणी अनेक घरांमध्ये शिरल्याने नागरिकांचे प्रचंड हाल झाले. मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या खरीप पिकांची रविवारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केली.

### पुलावरून पाणी; धाराशिव-लातूर राज्यमार्ग बंद

तेरणा धरण परिसरात एकाच रात्रीत झालेल्या मुसळधार पावसामुळे धाराशिव ते लातूर हा राज्यमार्ग रूई-ढोकी येथे बंद झाला होता. रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास रूई-ढोकी येथील पुलावरून जवळपास चार फूट पाणी वाहत असल्यामुळे वाहनधारकांनी धोक्याची शक्यता गृहीत धरून पाण्यातून वाहने घालणे टाळले होते.

## येणाऱ्या सर्व निवडणुकीत शतप्रतिशत भाजपा निर्माण करावा

### भाजपा लातूर ग्रामीणच्या संकल्प मेळाव्यात खा. अशोकराव चव्हाण यांचे प्रतिपादन

लातूर

लातूर ग्रामीण मतदार संघात धनशक्ती विरुद्ध सामान्य माणसाची शक्ती अशी लढाई झाली. या लढाईत जनतेनी साथ देवून रमेशआप्पांना निवडून देवून नवी क्रांती घडविली. संघर्षातून पुढे आलेले आप्पांचे नेतृत्व असून अशा नेतृत्वाला जनतेच्या प्रश्नाची, अडीअडचणीची जाण असते जनतेचे प्रेम आणि मेळाव्यास उपस्थित असलेली गर्दी पाहता हेच रमेशआप्पांचे बँक बॅलन्स आहे असे सांगून शत प्रतिशत भाजपा निर्माण करण्यासाठी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकीला एकजुटीने सामोरे जा, जनता आपल्या सोबत आहे असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री भाजपा नेते खा. अशोकराव चव्हाण यांनी केले.




लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नूतन ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील आणि शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचा सत्कार आणि कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा खा. अशोकरावजी चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी लातूर येथील विश्वपॅलेस मंगल कार्यालयात संपन्न झाला. या मेळाव्यास राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाचे अध्यक्ष गोविंदअण्णा केंद्रे, माजी आमदार अमर राजूरकर, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, प्रदीप पाटील खंडापूरकर, विक्रमकाका शिंदे, रामचंद्र तिरुके, ऋषिकेश कराड, ओमप्रकाश गोडभरले, त्र्यंबकआबा गुट्टे, सतीश आंबेकर, बन्सी भिसे, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, शरद दरेकर, सुरज शिंदे, उद्धव काळे, वैभव सापसोड, दशरथ सरवदे, वसंत करमुडे, श्रीकृष्ण जाधव यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

मोदीजींनी जे बोलले ते करून दाखवले यामुळे त्यांचा देशात करिष्मा कायम आहे. देशाचे नेतृत्व मोदीच करू शकतात हे सिद्ध झाले असून असे नेतृत्व आजपर्यंत कधीही देशाला मिळाले नाही. राज्यात देवेंद्रजींच्या नेतृत्वातील सरकार चौफेर विकासाची प्रगती करत आहे. मोदीजींनी भारताच्या आणि देवेंद्रजींनी महाराष्ट्राच्या विकासाचा संकल्प केला, मराठवाड्याच्या पर्यायाने लातूर जिल्ह्याच्या विकासाचा आपण संकल्प करूया असे सांगून यावेळी बोलताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, विरोधकाकडे कुठलाही मुद्दा नसल्याने दिशाहीन झालेल्या लोकांकडून मत चोरीचा आरोप करून जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मत चोरी करण्याची गरज पडली असती तर अर्चनाताई पराभूत झाल्या असत्या का आणि २५० मतांनी नाना पटोले विजयी झाले असते का असा प्रश्न त्यांनी उपस्थित करून जनतेचा काँग्रेसवर विश्वास राहिला नाही जनता त्यांच्या सोबत राहायला तयार नाही. संपूर्ण मराठवाड्यात सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन भारतीय जनता पार्टीसाठी परिश्रम, मेहनत घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपाची मजबूत सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

दोन वेळा पराभूत झालो म्हणून खचलो नाही आणि घेतलेला वसा खाली टाकला नाही. जनतेची प्रामाणिकपणे सेवा केली, अश्रू पुसण्याचे काम केले यामुळेच मतदार संघात दहशतीचे वातावरण असतानाही माय माऊलीनी मोठा आशीर्वाद दिला याचा मला सार्थ अभिमान असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरेंनी मतदारसंघ विकत घेतला नसता तर देशमुखांची पाट तेंव्हाच लावली असती दहशतीच्या या मतदारसंघात बहाद्दर मतदारांनी मस्तवालाची मस्ती मतपेटीतून जिरवण्याचे काम केले आहे असे सांगून सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा भाजपा पक्ष असून कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम पक्षात केले जाते. येत्या दोन-तीन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. लातूर महानगरपालिका जिंकणे हे आपले ध्येय असून भाजपाला शंभर टक्के यश मिळालेच पाहिजे रेणापूरसह लातूर पंचायत समितीवर भाजपची सत्ता आणण्यासाठी आतापासूनच सर्वांनी कामाला लागावे असे आवाहन केले.

भाजपा लातूर जिल्ह्याचं अध्यक्षपद हे माझ्या जीवनातील आनंदाचा क्षण आहे. आज झालेला सत्कार हा अध्यक्षपदाचा व कार्यकर्त्यांचा सन्मान असून या सत्काराच्या माध्यमातून प्रचंड ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली याबद्दल रमेशअप्पा कराड यांना धन्यवाद द्यावेत तेवढे कमी आहेत. लातूर ग्रामीणमध्ये विजयी होवून रमेशअप्पा कराड यांनी वेगळा इतिहास स्थापन केला असल्याचे सांगून बसवराज पाटील म्हणाले की, लातूरकरांवर नांदेडचे पूर्वीपासून प्रेम आहे. लातूरची माणसे मोठी झाली ती केवळ नांदेडच्या आशीर्वादामुळे रमेशआप्पा तुमच्या माध्यमातून पुन्हा नांदेडकरांचा आशीर्वाद आपल्याला राहणार आहे. राज्यात देवेंद्रजींच्या नेतृत्वात विकासाची घोडदौड सुरू आहे सर्व घटकांना न्याय देण्याचे काम होत आहे तेव्हा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मेहनतीने काम करून शंभर टक्के विजय प्राप्त करूया असे बोलून दाखवले.या कार्यक्रमात आ. अभिमन्यू पवार, पाशा पटेल, गोविंदअण्णा केंद्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करून भाजपाचे जिल्हाध्यक्ष यांच्या नेतृत्वात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एकत्रितपणे काम करून भाजपाला यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले. प्रारंभी नवनाथ भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर शेवटी भागवत सोट यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या कार्यक्रमास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी कार्यकर्ते महिला पुरुष मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पावसाळ्याचे दिवस असतानाही मोठ्या उत्साहाच्या वातावरणात झालेल्या या कार्यक्रमास मतदार संघातील गावागावातून आलेल्या भाजपा कार्यकर्त्यांसह मतदार बंधू भगिनींनी प्रचंड गर्दी केली होती. त्यात महिलांची संख्या लक्षणीय दिसून आली. मंगल कार्यालयातील मुख्य हॉलमध्ये जागा अपुरी पडत असल्याने तळमजल्यावरील सभागृहात उपस्थितसाठी अचानक पणे संयोजकांना स्क्रीनची व्यवस्था करावी लागली. दोन्ही मजल्यात तेवढीच गर्दी आणि बाहेर तशीच गर्दी दिसून येत होती. भाजपाचा विजय असो, देश का नेता कैसा हो नरेंद्र मोदी जैसा हो, अशोकरावजी तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, रमेशआप्पा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. एकूणच या कार्यक्रमात प्रचंड उत्साह आणि जल्लोष दिसणारा भाजपचे ध्वज ठिकठिकाणी लावण्यात आले होते तर भाजपाच्या अनेक मान्यवर नेत्यांचे असंख्य भव्य कटाआउट कार्यक्रमाच्या परिसरात उभे करण्यात आले होते.

## महेश सह. साखर कारखाना सुरू होणे आवश्यक

### ऊसाचे प्रमाण भरपूर; अनेकांना रोजगारही उपलब्ध होईल

संतोष सानप - आष्टी

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा असलेला महेश (कडा) सहकारी साखर कारखाना सुरू करण्याचे प्रयत्न विद्यमान संचालक मंडळ करत आहेत. आष्टी तालुक्यात दिवसेंदिवस उसाचे उत्पादन वाढत असल्याने करा सहकारी साखर कारखाना सुरू होणे आवश्यक आहे. हा कारखाना सुरू झाला तालुक्यातील शेतकऱ्यांचा उसाचा प्रश्न सुटेल तसेच अनेकांना बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होईल.

सध्या विद्यमान संचालक मंडळाकडून हा कारखाना सुरू करण्याचे प्रयत्न सुरू असून कारखाना साइटवर कामे देखील सुरू झालेले आहेत. लवकरच कारखाना सुरू होईल असे अपेक्षा शेतकरी करत आहेत.

एकेकाळी कडा सहकारी साखर कारखाना हा शेतकऱ्यांच्या आणि तालुक्याच्या आर्थिक क्रांतीचा मुख्य स्रोत बनला होता. या कारखान्याच्या माध्यमातून अनेकांना रोजगार उपलब्ध झाला होता. त्याचबरोबर आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसह शेजारच्या तालुक्यातील शेतकरी या कारखान्याला ऊस घालत होते. परंतु कारखाना कर्जबाजारी झाल्याने सन. २०१३ पासून बंद आहे.२०१८ मध्ये विद्यमान संचालक मंडळांनी हा सहकारी साखर कारखाना शिखर बँकेकडून भाडेतत्त्वावर घेऊन सुरू करण्याचा प्रयत्न देखील केला होता.मात्र गाळप परवानगी अभावी साखर कारखाना सुरू होऊ शकला नाही.आता पुन्हा एकदा हा साखर कारखाना सुरू करण्यासाठी विद्यमान संचालक मंडळाने प्रयत्न सुरू केले आहेत . कारखाना परिसरातील स्वच्छता कामास वेग आला असून कामगार निवास आणि विश्रामगृहाच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे.

गाळपाचा परवाना मिळाला तर यंत्रसामग्री दुरुस्ती करून लवकरात लवकर साखर कारखाना सुरू करण्याचा मानस आहे. कडा कारखाना कार्यक्षेत्रात ऊस उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांचे देखील हा कारखाना केव्हा सुरू होणार याकडे लक्ष लागलेले आहे. हा साखर कारखाना सुरू झाला तर अनेकांना रोजगार उपलब्ध होईल. त्याचबरोबर आष्टी मतदारसंघातील एक महत्त्वाची सहकारी संस्था नव्या उमेदीने कार्यरत होईल.



## विधायक संस्थात्मक उभारणीचे स्वामींचे सूत्र पूर्ण करायला हवे; हैदराबाद स्वातंत्र्य लढ्याचे अभ्यासक कौस्तुभ दिवेगावकर यांचे मत

छत्रपती संभाजीनगर

हैदराबाद संस्थानातील सामंतशाही, प्रशासकीय पातळीवरचा अनागोंदी कारभार, इंग्रज सरकारच्या अमलात असलेल्या प्रदेशापेक्षा उशिराने सुरू झालेली सामाजिक सुधारणांची चळवळ, संसाधनांची असमानता अशा कालखंडात जगणाऱ्यांना स्वामी रामानंद तीर्थ यांनी उभारलेल्या लढ्यामुळे आधुनिक लोकशाही व्यवस्थेत आणता आले. त्या काळात विधायक संस्थात्मक उभारणीला प्राधान्य देण्यात आले होते. ते अर्धवट राहिलेले सूत्र आता पूर्ण करावे लागेल, असे मत सनदी अधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांनी व्यक्त केले.

'संन्याशाच्या डायरीतून-हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी' या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेचे विश्वस्त डॉ. सुरेश खुरसाळे होते. या वेळी व्यासपीठावर पत्रकार निशिकांत भालेराव, सारंग टाकळकर, 'साधना' चे संपादक विनोद शिरसाठ यांची उपस्थिती होती.

'निजामाने उभ्या केलेल्या रझाकाराच्या विरोधात उभा राहिलेल्या लढ्याला तेव्हा पैसा कमी पडत होता. म्हणून स्वामी रामानंद तीर्थ महात्मा गांधींकडे गेले. त्यांनी चळवळीसाठी पैसा मागितला. गांधींनीही कोरा धनादेश दिला. पण तो देताना ते म्हणाले, चळवळीसाठी माणसं आणि पैसा आपणच उभा करायचा असतो. स्वामी रामानंद तीर्थ यांनी तो धनादेश घेतला नाही आणि माणसं आणि पैसा दोन्ही स्वत: उभा केला. त्यामुळेच जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा सर्वसामान्य माणसांच्या तोंडी तीन नावे होती, पंडित नेहरू, सरदार पटेल आणि स्वामी रामानंद तीर्थ. महात्मा गांधीच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्याच विचाराने हैदराबाद मुक्तीचा लढा सामंतशाही विरोधाचा होता. अनागोंदी दूर करण्यासाठी होता.' असे दिवेगावकर म्हणाले.



निजामकालीन हैदराबाद संस्थानांतील अनागोंदीची त्यांनी काही उदाहरणे दिली. निजाम हे केवळ एक संस्थान होते असे नाही तर १४ उपसंस्थाने होती. निजामापेक्षाही या जहागीरदारांनी लोकांना शेतात नुसतेच राबवून घेतले होते. राबणारा वेगळा आणि मालकी वेगळी अशा व्यवस्थेत एवढी अनागोंदी होती की, परळीच्या व्यक्तीला एखादे सरकारी काम पडले तर त्याचा जिल्हा तेलंगणामध्ये होता. अगदी एका उपसंस्थानाचे नावही अनागोंदी असेच होते.

अशा कालखंडात स्वातंत्र्याचा लढा स्वामींची उभारला. त्यांची प्रतिमा खरे तर मुत्सद्दी प्रशासकीय नेता अशी आपण चितारत नाही, याचे आश्चर्य वाटते, असेही दिवेगावकर म्हणाले. कमी संख्येने होत पण होते, असे सांगत या लढ्याचे रूप कधी धार्मिक होणार नाही याची काळजी स्वामी रामानंदतीर्थ कशी घेत हे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांनी केले. विनोद शिरसाट यांनी पुस्तक प्रकाशनाबाबतची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रश्मी बोरीकर यांनी केले.